# 0106 (New) Ⓐ

Total No. of Questions—15

Total No. of Printed Pages—4 Regd. No. [ ]

## Part II

# MARATHI, Paper I

**(Second Language)**

*Time : 3 Hours]* *[Max. Marks : 100*

**Note : —** सर्व प्रश्न सोडवा.

### विभाग 'अ'

**1.** खालीलपैकी कोणत्याही **एका** कवितेचा सारांश लिहा : 1×6=6

(1) झाडांच्या मनात जाऊ

(2) पैंजण.

**2.** (अ) खालीलपैकी कोणत्याही **दोन** पद्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा : 2×5=10

(1) शेला हिरवा पांघर
मालकांच्या स्वप्नांवर,

(2) माझा मराठाचि बोलु कौतुकें। परि अमृतातेंही पैजां जिंके॥

(3) "मरणाच्या धारेत सापडलो तेव्हा, शब्दांनीच माझ्याकडे किनारा सरकवला"

(4) जवळुनि गेलिस पेरित अपुल्या
मंद पावलांमधल्या गंधा.

(आ) खालीलपैकी कोणत्याही **दोन** उताऱ्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा : 2×5=10

(1) माणूसपणाचं पोषण होण्यासाठी हवाय संवाद! संवाद हा माणूसपणाचा पायाभूत धर्म आहे.

(2) प्रतिभा हे कवीला लाभलेले निसर्गाचे देणे आहे.

(3) "मामू, तुमच्या पोराचं लग्न आहे तर न येऊन कसं चालेल ? नक्की येईन." मी उत्तर दिलं.

(4) उषावहिनी डोळे पुसून म्हणाल्या, "उठव मला. साडेचार वाजता शिवाजी मंदिरमध्ये पोचायला हवंय."

3. खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा : 2×4=8

(1) 'स्त्रीने स्वतःच्या आत्मसन्मानाला जपले पाहिजे', याविषयीचे तुमचे विचार लिहा.

(2) 'टॉलस्टॉय पहिल्या दर्जाचा कलावंत ठरतो', या विधानाची यथार्थता पटवून द्या.

(3) मामूच्या व्यक्तिमत्त्वाचे चित्रण तुमच्या शब्दात लिहा (रहाणीमान, रूप).

(4) "मानवी जीवनात संवादाचे महत्त्व" याविषयी तुमचे मत स्पष्ट करा.

4. खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा : 2×4=8

(1) 'कवयित्री आणि प्राणसई' यांच्यातील नाते जिव्हाळ्याचे आहे, हे स्पष्ट करा.

(2) 'दवांत आलिस भल्या पहाटीं' कवितेतील जाणवलेले प्रेमविषयक वेगळेपण स्पष्ट करा.

(3) मराठी भाषेची थोरवी तुमच्या शब्दात लिहा.

(4) आयुष्यात आलेले नकार कवीने कोणत्या शब्दात व्यक्त केले आहेत, ते लिहा.

5. (अ) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 4×1=4

(1) बहिणाबाई चौधरी यांच्या मुलाचे नाव सांगा.

(2) शाळेबाहेरचा बहुरूपी कोण आहे ?

(3) 'माणूस' बांधूया! पाठाचे लेखक कोण ?

(4) 'उषा तयार आहेस ना ?' हा प्रश्न कोणी विचारला ?

(आ) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 4×1=4

(1) प्राणसई ही कविता कोणत्या छंदातील आहे ?

(2) "ऐसीं अक्षरें रसिकें" ही कविता कोणी लिहिली ?

(3) शब्दाचा उजेड म्हणजे काय ?

(4) सर्व जगाला जागवणारा कोण ?

## विभाग 'ब'

6. खालील प्रश्नाचे उत्तर लिहा : 1×5=5

संगीत नाटकाचे स्वरूप व वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

7. खालीलपैकी **एका** प्रश्नाचे उत्तर लिहा : 5×1=5

(1) प्रस्तुत उताऱ्यावरून कृष्णरावांचे व्यक्तिचित्र रेखाटा.

(2) नाट्यउताऱ्यातील 'डॉक्टर'ची भूमिका स्पष्ट करा.

8. खालीलपैकी कोणतेही **दोन** प्रश्न सोडवा : 2×5=10

(अ) प्रकाशन समारंभासाठी कार्यक्रम पत्रिकेचे प्रमुख मुद्दे सांगा.

(ब) खालील खुणांचा अर्थ स्पष्ट करा :

(1) f →

(2) (/) →

(3) – →

(4) (...) →

(5) ~ →

(क) अनुवादाची कार्यक्षेत्रे स्पष्ट करा.

(ड) चांगल्या अनुदिनीची वैशिष्ट्ये तुमच्या शब्दात लिहा.

**9.** शब्दशक्तीचे प्रकार सांगून अभिधेची वैशिष्ट्ये लिहा. 1×4=4

**10.** सूचनेनुसार वाक्य बदला : 3×1=3

(1) मी तबला वाजवतो. (रीती भूतकाळ करा)

(2) श्याम घरी आला. वादळाला सुरुवात झाली. (मिश्र वाक्य करा)

(3) नाटकाचा तिसरा घंटा वाजला. नाटकाला सुरुवात झाली. (संयुक्त वाक्य करा)

**11.** विरुद्धार्थी शब्द लिहा (कोणतेही **पाच**) : 5×1=5

(1) साक्षर ×

(2) ज्ञान ×

(3) गुण ×

(4) उंच ×

(5) भरती ×

(6) सुपीक ×

(7) जुने ×

**12.** खालीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांचे वचन बदला : 5×1=5

(1) केळी –

(2) घोडा –

(3) खुर्ची –

(4) नारळ –

(5) डोळे –

(6) बहीण –

(7) नदी –

**13.** खालीलपैकी कोणत्याही **तीन** वाक्यांचे मराठीत भाषांतर करा : 3×1=3

(1) Books are our best friends.

(2) Deepawali is the festival of lights.

(3) Peacock is beautiful bird.

(4) Sea water is saltish.

(5) Knowledge is power.

**14.** कोणत्याही **पाच** शब्दांना समानार्थी शब्द लिहा : 5×1=5

(1) वात, अनिल, ......................

(2) चंद्र, सुधाकर, ......................

(3) फुल, सुमन, ......................

(4) विद्युत, सौदामिनी, ......................

(5) समुद्र, रत्नाकर, ......................

(6) गणेश, लंबोदर, ......................

(7) पाणी, उदक, ......................

**15.** उपसर्ग आणि प्रत्यय लावून शब्द तयार करा (कोणतेही **पाच**) : 5×1=5

(1) संपादक –

(2) गुलाम –

(3) जड –

(4) दुकान –

(5) धाव –

(6) पसंत –

(7) घड –